# १२. सलाम–नमस्ते !

**सुधा मूर्ती** (१९५०) : प्रसिद्ध लेखिका. 'वाइज अँड अदरवाइज', 'सामान्यांतले असामान्य', 'अस्तित्व', 'आजीच्या पोतडीतल्या गोष्टी', 'आयुष्याचे धडे गिरवताना', 'बकुळा', 'गोष्टी माणसांच्या' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध. प्रस्तुत पाठ 'पुण्यभूमी भारत' या कथासंग्रहातून घेतला आहे. सुधा मूर्ती यांच्या मूळ इंग्रजी कथासंग्रहाचा मराठी अनुवाद लीना सोहोनी यांनी केला आहे.

C3CS57

अत्यंत गरीब परिस्थिती असूनही माणुसकी, प्रामाणिकपणा, कष्टाळूवृत्ती, दुसऱ्यांच्या दु:खांविषयीची जाणीव इत्यादी गुण शेख महंमद व त्याची मृत्यूच्या दारात उभी असलेली बहीण झुबेदा यांच्या ठायी दिसून येतात.

प्रस्तुत पाठात लेखिकेने याचे अत्यंत हृदयस्पर्शी वर्णन केले आहे.

**माहिती मिळवा.**

- तुमच्या परिसरातील गरजू, अनाथ, अपंग इत्यादी व्यक्तींसाठी काम करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांविषयी माहिती मिळवा.

शेख महंमदचं एक छोटंसं दुकान होतं. तो वह्यांची किरकोळीनं विक्री करायचा. दरवर्षी जून महिन्यात मी त्याच्याकडून मोठ्या संख्येनं वह्या विकत घेत असे. आम्ही त्या झोपडपट्टीतील शाळकरी मुलांमध्ये वाटत असू. त्याचं दुकान आमच्या ऑफिसच्या जवळच होतं. दुकानाची जागा भाड्याची होती. शेख महंमद फार संकोची स्वभावाचा होता. तो वह्या आणून आमच्याकडे पोहोचवायचा. आमचा चेक तयार झाला, की आम्ही त्याला तसं कळवायचो. मग तो येऊन चेक घेऊन जायचा.

एकदा असाच तो आमच्या ऑफिसात आला होता. त्या वेळी आम्ही सर्वजण मिठाई खात होतो. मी शेखच्या हातावर मिठाई ठेवली; पण त्यानं ती खाल्ली नाही.

''का रे शेख ? तुला मधुमेहाचं दुखणं वगैरे आहे का ?''

''नाही मॅडम. खाऊ घरी न्यावा म्हटलं. घरात लहान मुलं आहेत. माझ्यापेक्षा त्यांनाच याची गोडी जास्त.''

''तुला किती मुलं आहेत ?'' मी विचारलं. ती तेवढीशी मिठाई घरी जाऊन पुरली असती की नाही, कोणास ठाऊक !

''मॅडम, मला एक मुलगी आहे. शिवाय माझी भाचीपण माझ्याकडेच असते.''

''का बरं ? तुझी भाची तुझ्याकडे का असते ?''

''माझी बहीण झुबेदा विधवा आहे आणि ती आमच्याकडेच राहते.''

मला ते ऐकून शेखबद्दल वाईट वाटलं. तो एक छोटा दुकानदार होता. तो काही खूप कमवत नव्हता, त्यामुळे त्याच्या कुटुंबाविषयी आणखी माहिती काढावीशी मला वाटली.

''झुबेदा काय करते ?''

''ती उत्तम शिवणकाम करते. ती आणि माझी बायको अशा दोघीजणी मिळून घरी शिवणाचा व्यवसाय करतात. अल्लाची मेहेरबानी आहे. आमचं छोटंसं भाड्याचं घर आहे. आम्ही समाधानी आहोत.''

त्याचं ते उत्तर माझ्या हृदयाला स्पर्श करून गेलं. आजकालच्या जगात 'समाधान' हा शब्द तसा दुर्मीळच झाला आहे.

असेच काही महिने लोटले आणि एक दिवस शेखचा मला फोन आला, ''मॅडम, या खेपेला मला तुम्ही चेक ॲडव्हान्समध्ये देऊ शकाल का ?''

''का बरं शेख ? काही खास कारण ?''

''होय मॅडम. झुबेदाला कॅन्सर झालाय. उद्या तिचं ऑपरेशन आहे.''

मी ताबडतोब ऑफिसात निरोप ठेवून चेक त्याच्या घरी लगेच पाठवून दिला; पण त्याच्याबद्दल मनात

विचार येऊन मन उदास झालं. त्या ऑपरेशनचा खर्च भरपूर येणार होता, ती रक्कम जमा करण्यासाठी शेखची नक्कीच खूप धावपळ चालू असणार; पण तरीही त्यानं माझ्याकडे पैसे मागितले नव्हते.

अनुभवानं मला बरंच काही शिकवलंय. आपल्या स्वत:च्या हिऱ्याच्या कुड्या पर्समध्ये लपवून गोरगरिबांसाठी निधी गोळा करायला आलेल्या बायका मी पाहिल्या आहेत. आपल्या मुलांना शिष्यवृत्ती मिळावी, म्हणून ती मुलं अनाथ असल्याचं सांगताना, चांगल्या सधन कुटुंबातल्या आई-वडिलांना मी पाहिलंय. कितीतरी माणसं फाउंडेशनकडून मदत पदरात पाडून घेण्यासाठी आपल्या आईला निराधार ठरवून मोकळी होतात, हेही मी पाहिलंय. जर एखाद्या व्यक्तीला मदत मिळाली नाही, तर ती व्यक्ती आयुष्यातून उठेल असं आम्हांला ज्या कुणाबद्दल वाटेल, त्यालाच फाउंडेशन मदत करेल, असा माझा नेहमी आग्रह असतो.

मी शेखला फोन केला. ''शेख, मला एक सांग, या ऑपरेशनच्या पैशांची काय व्यवस्था केली आहेस तू?''

''मॅडम, मी झुबेदाचे आणि माझ्या बायकोचे सगळे दागिने विकले आहेत. शिवाय बँकेकडूनही थोडं कर्ज घेतलं आहे.''

''शेख, तू आम्हांला का नाही मदतीसाठी विचारलंस?''

''मॅडम, मला निदान एवढं तरी परवडतंय; पण आणखी कित्येक लोक आमच्याहूनही गरीब असतात. माझ्यापेक्षा त्यांना तुमच्या मदतीची जास्त गरज आहे.''

त्याचं ते उत्तर ऐकून मन हेलावलं. जास्त काही न बोलता मी त्याला दुसऱ्या दिवशी हॉस्पिटलची सर्व कागदपत्रं घेऊन येण्यास सांगितलं. मी त्याला पुढे काही बोलायची संधीच दिली नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी सगळी कागदपत्रं घेऊन तो ऑफिसात आला. मी त्याला थोडा वेळ थांबायला सांगितलं. सगळी कागदपत्रं नीट तपासून पाहिली आणि नंतर त्याला पन्नास हजारांचा चेक लिहून दिला. त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्य होतं. ''मॅडम, तुमच्याकडून एवढे पैसे मिळतील असं मला वाटलंच नव्हतं. तुम्ही माझ्या संकटात आपलं माणूस समजून मदतीला धावून आला आहात.''

हे असलं बोलणं मी सहसा फारसं मनावर घेत नाही. जेव्हा कधी मी गरजूंना मदत करते तेव्हा ते मला असं काहीतरी म्हणतातच; पण एकदा त्यांची गरज भागली, संकटातून मुक्तता झाली, की ते बोलण्याचेही कष्ट घेत नाहीत. असेच काही दिवस लोटले. ऑपरेशन व्यवस्थित पार पडल्याचा निरोप शेखनं आमच्या ऑफिसात ठेवला होता. त्यानंतर बरेच दिवस त्याच्याकडून काहीच बातमी कळली नाही. आमचंही त्याच्याकडे काही काम निघालं नव्हतं.

एक दिवस सकाळच्या वेळी मी ऑफिसात पाऊल टाकलं आणि रिसेप्शन काउंटरपाशी शेख थांबलेला मला दिसला. त्याच्याबरोबर चार वर्षांची छोटी मुलगीपण होती. तिच्या अंगात साधाच सुती फ्रॉक होता; पण झालरी, बटणं वगैरे लावून सुरेख शिवलेला होता. तिच्या केसांना भरपूर तेल लावून चापूनचोपून एक पोनीटेल बांधली होती.

शेखचा चेहरा दु:खी दिसत होता.

''काय शेख? कसा आहेस तू? तुला भेटीची वेळ वगैरे दिली होती की काय?''

''सॉरी मॅडम, दोन आठवड्यांपूर्वीच झुबेदा गेली. तुम्ही तिला इतकी मदत केली; पण तिचं नशीबच खोटं. खरंतर तुम्हांला येऊन भेटायची, तुम्हांला सलाम करायची इच्छा होती हो तिची; पण अल्लानं तिला नेलं. मी तिच्या मुलीला घेऊन आलोय. ही तबस्सुम.''

मी तबस्सुमकडे पाहिलं. हे एवढं मोठं ऑफिस... ही सभोवताली एवढी सगळी अनोळखी माणसं... बिचारी बावरली होती.

त्या अनाथ मुलीकडे पाहून मला वाईट वाटलं. आपल्या नशिबात काय वाढून ठेवलंय, याची तिला कल्पनाही नव्हती. तिच्या मामानं तिला सांगितलं, ''बेटी, मॅडमको सलाम करो!'' त्याबरोबर त्या पोरीनं आपले इवलेसे हात उचलून मला सलाम केला.

माझ्या तोंडून शब्द फुटेना.

शेखनं डाव्या हाताच्या बोटांनी डोळे पुसले आणि खिशातून एक पाकीट काढलं. ''मॅडम, हे तुमच्यासाठी आहे. झुबेदानं पाठवलंय. मला यायला उशीर झाला त्याबद्दल सॉरी हं.''



मी तो लिफाफा उघडला. आत तीन हजार रुपये होते. मी गोंधळून शेखकडे पाहिलं. ''मॅडम, तुम्ही पन्नास हजार दिले होते; पण झुबेदाचं ऑपरेशन आणि औषधपाण्यासाठी फक्त सत्तेचाळीस हजारच खर्च आला. आपण आता यातून काही वाचत नाही हे जेव्हा झुबेदाला समजलं, तेव्हा ती म्हणाली, 'आपण उरलेले पैसे मॅडमना परत करू. निदान दुसऱ्या कुणाच्यातरी उपयोगाला येतील. एखादा नशीबवान असेल, त्याचा जीवतरी वाचेल. आता हे पैसे माझ्यावर खर्च करून वाया घालवायला नकोत आपण.' ''

माझ्या नकळत माझ्या डोळ्यांतलं पाणी गालावरून वाहू लागलं. मी झुबेदाला कधीच भेटले नव्हते; पण दुसऱ्यांविषयीची तिच्या मनातली ही कळकळ पाहून मी थक्क झाले.


इतक्या गरिबीत आणि यातना सहन करतानासुद्धा तिनं दुसऱ्या गरजू रुग्णांचा विचार करावा, ही गोष्ट विस्मयचकित करून सोडणारी होती. आपण स्वत: संकटाशी झुंज देत असताना दुसऱ्याचा विचार करणारी माणसं या जगात विरळच ! इथे तुमचं शिक्षण, भाषा, जातपात, धर्म या कशाकशाचा संबंध नसतो. त्यासाठी हृदयात अपार करुणा असावी लागते.

मी तो लिफाफा तसाच शेखला परत देऊन म्हणाले, ''हे पैसे तबस्सुमसाठी आहेत. अल्लाची तिच्यावर मेहेरबानी असू दे. तिला नीट शिकू दे. तुला जर काही मदत लागली, तर प्लीज मला सांग. इतरांविषयी करुणेची भावना बाळगण्याच्या बाबतीत ती आपल्या आईच्याही चार पावलं पुढे जाऊ दे. आपली ही जी भूमी आहे ना, ती श्रीमंत का आहे, माहीत आहे? सोन्याच्या किंवा हिऱ्याच्या खाणी तिच्या पोटात आहेत, म्हणून नव्हे. या झुबेदासारख्या लोकांमुळेच तिचं ऐश्वर्य वाढणार आहे.''

तबस्सुम नुसती तिथे बसली होती. तिला काहीच कळत नव्हतं. माझे शब्द पचनी पडणं शेखलाही कठीण जात होतं.

***

https://en.wikipedia.org/wiki/Sudha_Murthy



## स्वाध्याय

**प्र. १. खालील वाक्यांमधून पाठातील त्या त्या व्यक्तीचा दिसणारा गुण लिहा.**

(अ) लेखिका झोपडपट्टीतील शाळकरी मुलांमध्ये वह्या वाटत.


(आ) 'माझ्यापेक्षा त्यांनाच याची गोडी जास्त.'

(इ) ''मॅडम, माझ्यापेक्षा गरीब लोकांना तुमच्या मदतीची जास्त गरज आहे.''

(ई) ''मॅडम, तुम्हांला सलाम करण्याची झुबेदाची इच्छा होती.''

(उ) त्या अनाथ मुलीकडे बघून मला वाईट वाटलं.

**प्र. २. स्वभाववैशिष्ट्ये लिहा.**




**प्र. ३. शेख महंमदमार्फत झुबेदाने उरलेले पैसे लेखिकेला परत केले, ही घटना तुम्हांला काय शिकवते?**

**प्र. ४. लेखिकेची तबस्सुमविषयीची भावना तुमच्या शब्दांत सांगा.**

## खेळूया शब्दांशी.

- **खालील इंग्रजी शब्दांसाठी वापरले जाणारे मराठी भाषेतील शब्द लिहा.**

| | | |
|---|---|---|
| (१) ऑफिस– | (३) हॉस्पिटल– | (५) ऑपरेशन– |
| (२) चेक– | (४) ॲडव्हान्स– | (६) कॅन्सर– |



## विचार करा. सांगा.

- **या पाठातील कोणत्या व्यक्तिरेखा तुम्हांला आवडल्या व त्या का आवडल्या याबद्दल तुमचे मत सांगा.**
- **या पाठातून मिळणारा संदेश तुमच्या शब्दांत सांगा.**

## माहिती मिळवूया.



- **गरजू रुग्णांना मदत करणाऱ्या अनेक सेवाभावी संस्था आहेत, त्याविषयी आंतरजालावरून माहिती मिळवा.**
- **खालील स्वभाववैशिष्ट्ये असलेल्या तुमच्या परिसरातील व्यक्तींची नावे लिहा.**

(गप्पिष्ट, लाजाळू, रागीट, शांत, हजरजबाबी.)

- **खालील चित्रे पाहून आपल्या भावना व्यक्त करणारी वाक्ये लिहा.**





- **खालील वाक्यांत योग्य केवलप्रयोगी अव्यये लिहा.**

(अ) ·············· काय सुंदर आहे ताजमहाल !

(आ) ·············· किती जोरात ठेच लागली !

(इ) ·············· किती उंच आहे ही इमारत !



**वाचा.**

- **खालील उतारा काळजीपूर्वक वाचून आशयानुसार परिच्छेद तयार करा. उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.**

वर्गातील मुलांना बाई सांगत होत्या, ''आपलं बोलणं, वागणं, आवडीनिवडी, स्वभाव, विचार, सवयी एवढंच नव्हे, तर आपली प्रकृती, आरोग्य, बुद्‌धिमत्ता या सर्व गोष्टींचा परिणाम आपल्या व्यक्तिमत्वावर होत असतो. आपल्याला अवांतर वाचन करायला, मैदानावर खेळायला आवडत असेल, मित्रांची संगत, सोबत भावत असेल, तर या सर्व गोष्टी आपलं व्यक्तिमत्त्व फुलवण्यात साहाय्यक ठरतात. घरातल्या वातावरणाचा, संस्कारांचा परिणाम आपल्या वर्तनावर, स्वभावावर, विचारांवर व आपल्या भाषेवर होत असतो. ज्या घरात मुलांच्या विचारांना, मतांना, प्रश्न विचारण्याला स्वातंत्र्य दिलं जातं, त्या घरातील मुलं स्वतंत्र विचारांची व ठाम व्यक्तिमत्वाची होतात. त्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव असते. याउलट काही मुलं फार आक्रमक असतात. 'मी म्हणेन तेच खरं' अशी वागणारी असतात. अशी मुलं इतरांच्या भावनांची कदर करत नाहीत. त्यांच्या वागण्यात बेजबाबदारपणा, बेफिकीर वृत्ती जाणवते. ती कायम ढेपाळलेली, अरसिक, रूक्ष व निरुत्साही, घाबरलेली, चिंतित असतात. अशी मुलं कुणाचे चांगले मित्र बनू शकत नाहीत व मनमोकळेपणानं वावरू शकत नाहीत. तुम्हांला तुमचं व्यक्तिमत्त्व कसं घडवायचं आहे, हे केवळ तुमच्या हातात आहे. स्वत:ला फुलवायचं, अष्टपैलू बनवायचं, की अरसिक, बेजबाबदार बनवायचं; स्वत:चे विचार व्यक्त करायला शिकायचं, की दुसऱ्याच्या ओंजळीनं पाणी प्यायचं; दिलखुलास जगायचं की रडतखडत, घाबरत घाबरत जगायचं, तुम्हीच ठरवा, स्वत:ला कसं घडवायचं.''